# ब्रह्मज्ञान

'ब्रह्मघोटाळा' हा शब्दप्रयोग व्यवहारामध्ये आपण अनेक वेळा ऐकतो. अत्यंत विसंगत घटनाक्रम समोर आल्यावर जेव्हा काही कळेनासे होते तेव्हा हा शब्दप्रयोग केला जातो. ब्रह्मज्ञानासंबंधीच्या सूक्ष्मातिसूक्ष्म विचारांच्या गुंतागुंतीतूनच हा शब्दप्रयोग व्यवहारात रूढ झाला आहे. त्यामुळे जनसामान्यांची ब्रह्मज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी कळून येते. त्यात तथ्य आहे हे ही खरे आहे. हा गुंता काही प्रमाणात सोडविण्याचा प्रयत्न ह्या लेखात केला आहे. त्यामुळे मुमुक्षू साधकांना 'ब्रह्मज्ञान' ही संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होईल अशी आशा आहे. गुंता होण्याची मुख्य कारणे अशी –

१) ब्रह्माला अवयव नसल्याने ते अरूप आहे. खडीसाखरेचे कण खडीसाखरेचे अवयव म्हणजे सूक्ष्म घटक आहेत. त्यांना रूप (Form) असल्याने ते एकत्र होऊन बनलेल्या खडीसाखरेच्या खड्यालाही रूप असण्याचा किंवा नसण्याचा प्रश्नच येत नाही ते असतेच. ब्रह्म अवयवशून्य आहे व म्हणून ते अरूप आहे. ज्याला रूप नसते ते डोळ्यांना दिसत नाही. जे डोळ्यांनी दिसत नाही त्याचे ज्ञान होण्याची कल्पना दैनंदिन जीवनातील अनुभवाशी सुसंगत नसल्याने ती पटत नाही.

२) दैनंदिन व्यवहारात दिसल्यावर ज्ञान होते तसेच ऐकून, वास घेऊन, चव घेऊन व स्पर्श करूनही ज्ञान होते. ब्रह्मज्ञान ह्यातील कशानेच होत नाही. ऐकण्यासाठी आवाजाची गरज आहे. आवाज होण्यासाठी दोन सावयव पदार्थ एकावर एक आदळावे लागतात. उदा. स्वरयंत्राच्या पट्ट्या (Vocal Cords) एकमेकांवर आदळून शब्द म्हणजे आवाज निघतो. वारा वाहू लागला की घर्षणाने आवाज येतो. ब्रह्म अवयवरहित, आकारशून्य व अखंड असल्याने एकमेकांवर आदळण्यासारखे त्यात काही नाही. त्यामुळे विशिष्ट आवाजावरून जशी व्यक्तीची ओळख पटते तशी ब्रह्माची पटत नाही. म्हणजे त्याचे ज्ञान होत नाही. त्वचेचा जेव्हा सावयव व रूपवान पदार्थाशी संबंध येतो तेव्हा त्याचे त्वचेला ज्ञान होते. उष्ण, थंड, मऊ, कठीण इ. सावयव व रूपवान पदार्थाच्या गुणधर्मांचे ज्ञान होते.

ब्रह्माला असा गुणधर्म नसल्याने त्याचे त्वचेला ज्ञान होणे शक्य नाही. नाकाला गंधकणांचा वास येतो. गंधकण कितीही सूक्ष्म असले तरी त्यांना सूक्ष्म का होईना पण रूप असते. त्या कणांना विशिष्ट गंधाचा गुण किंवा धर्म असतो. ब्रह्म अरूप व निधर्म असल्याने नाकाने त्याचा वास येऊन त्याचे ज्ञान होत नाही. गोड, आंबट, खारट, तिखट, कडू व तुरट हे सहा रस अनेक पदार्थात व्यापून असतात. ते पदार्थ सावयव असून रस हा त्यांचा धर्म किंवा गुण असतो. ब्रह्म निरवयव व निराकार व गुणरहित असल्याने त्याला रस नाही म्हणून जिभेला त्याचे ज्ञान होत नाही. अशा प्रकारे पाच ज्ञानेंद्रियांनी न कळणाऱ्या ब्रह्माला 'स्वसंवेद्य' असे म्हणतात. (पहा ज्ञानेश्वरीची पहिली ओवी)

**येन रूपं रसं गन्ध शब्दान् स्पर्शांश्च मैथुनान् ।**
**एतेनैव विजानाति किमत्र परिशिष्यते । एतद्वै तत् ।।** कठ २-१-३ ।।

'स्वसंवेद्य' हा शब्द व्यवहारात 'ज्याचे त्याला कळणारे' अशा अर्थाने वापरतात. ते वेदान्तशास्त्राच्या दृष्टीने संपूर्ण चुकीचे आहे. उदा. 'माझे दुःख मला माहीत' असे म्हणावयाचे असेल तर दुःख स्वसंवेद्य आहे असे म्हटले जाते. 'पाच ज्ञानेंद्रिये व बुद्धी ह्यांनी ज्याचे ज्ञान होत नाही व प्रत्यक्षादी नऊ प्रमाणांनी ज्याचे ज्ञान होत नाही, तर त्याचे ते नित्य प्रकाशमान म्हणजे ज्ञानरूपाने अनुभवरूप असते ते स्वसंवेद्य' असा स्वसंवेद्य ह्या शब्दाचा शास्त्रीय अर्थ आहे. असे तत्त्व असू शकते हे श्रद्धेने स्वीकारून त्याचा अनुभव आला की श्रद्धेचे सार्थक होऊन नंतर तिचे काम उरत नाही. दुःख 'माझ्याहून' वेगळे असल्याने 'मला' कळते. ब्रह्म मीच असल्याने दुःखाप्रमाणे मला त्याचे ज्ञान होत नाही. प्रत्यक्ष, अनुमान, उपमान,अर्थापत्ती, शब्द, अनुपलब्धी, शक्य, ऐतिह्य व चेष्टा अशी ज्ञानाची नऊ प्रमाणे शास्त्रकार सांगतात. ह्या सर्व प्रमाणांनी व्यावहारिक ज्ञान होऊ शकते पण ब्रह्मज्ञान मात्र होत नाही.

१) **प्रत्यक्ष** - डोळ्यासारख्या ज्ञानेंद्रियाने प्रत्यक्ष पाहून जेव्हा कोणा सावयव व रूपवान पदार्थाचे ज्ञान होते तेव्हा त्याला 'प्रत्यक्ष प्रमाणाने होणारे ज्ञान' म्हणतात. 'चाक्षुष प्रत्यक्ष' किंवा 'प्रमाज्ञान' असेही त्याला नाव आहे. त्यालाच 'वृत्तिज्ञान' असेही म्हणतात. (वृत्तिज्ञान हा शब्द बराच व्यापक असला तरी डोळ्यांनी होणारे

रूपाचे ज्ञान हे वृत्तिज्ञान असते असे म्हणता येते.) ब्रह्मज्ञान ह्या प्रकाराने होत नाही हे आपण आताच पाहिले आहे.

२) **अनुमान** - बुद्धिमान माणूस ज्ञानासाठी केवळ ज्ञानेंद्रियांवर अवलंबून न राहता त्या ज्ञानेंद्रियांच्या ज्ञानावर निर्भर असलेल्या तर्कानेही ज्ञान मिळवतो. उदा. अनुमान. दूरच्या डोंगरावर धूर दिसला तर तेथे न दिसणाऱ्या अग्नीचे ज्ञान होते. कारण स्वयंपाकघरात जेव्हा धूर होतो तेव्हा अग्नी असतो हे प्रत्यक्ष प्रमाणाने केव्हा तरी पाहिलेले असते. त्यावरून 'धूर तेथे अग्नी' असे अनुमान करून न दिसणाऱ्या अग्नीचे ज्ञान होऊ शकते. ब्रह्मज्ञान ह्या प्रकारे होत नाही. धुरावरून जसा अग्नी कळतो तसे ब्रह्म कशावरून कळणार? कारण ब्रह्माशिवाय दुसरे काहीच नाही. ते एकमेव अद्वितीय आहे. धूर हा जर अग्नीचा विकार मानला तर ब्रह्म निर्विकार आहे (विकार - एक दुय्यम परिणाम).

३) **उपमान** - उपमान हे आणखी एक प्रमाण आहे. उदा. कोणी वाटसरूला एकट्याने जंगलातून प्रवास करावयाचा आहे. त्याला असे कळले की त्या जंगलात बरेच लांडगे आहेत. पण त्याने लांडगा कधीच पाहिलेला नाही. तेव्हा चौकशी केल्यावर त्याला असे सांगण्यात आले की 'लांडगा फार मोठ्या कुत्र्याप्रमाणे दिसतो' तो जंगलातून चालू लागल्यावर त्याला फार मोठ्या कुत्र्यासारखा प्राणी दिसल्यावर 'हा लांडगा' असे ज्ञान झाले. येथे लांडग्याला फार मोठ्या कुत्र्याची उपमा दिली. लांडगा उपमेय व कुत्रा उपमान होय. परंतु ब्रह्मासारखी दुसरी वस्तू नसल्याने उपमेच्या साहाय्याने ह्या प्रकारे ब्रह्मज्ञान होणे शक्य नाही. '**तुका म्हणे सर्वोत्तमा। तुज काय द्यावी उपमा।**' असे तुकाराममहाराज म्हणतात.

४) **अर्थापत्ती** - अर्थापत्ती हे चवथे प्रमाण आहे. प्रत्यक्ष कारण न दिसता कार्य दिसले तर त्यावरून त्या कार्याच्या कारणाचे ज्या तर्काने ज्ञान होते त्याला अर्थापत्ती म्हणतात. उदा. कोणी व्यक्ती दिवसभर काही खाताना कधी न दिसताही धष्टपुष्ट असेल तर ती व्यक्ती रात्री व्यवस्थित जेवत असली पाहिजे असे लक्षात येऊन त्या पुष्टीच्या कारणाचे ज्ञान होते. जेवण हे पुष्टीचे कारण आहे. पुष्टी हे कार्य आहे. कार्य दिसते पण कारण दिसत नसल्यास त्याविषयी तर्क करावा लागतो. ब्रह्म हे कोणाचे कार्य नसल्याने व त्याला कारण नसल्याने त्या कारणावरून ब्रह्मरूप कार्याचे ज्ञान होणे शक्य नाही.

५) **शब्द** - स्वरयंत्रातून बाहेर पडणारा ध्वनी जिव्हा, जिव्हामूल, तालू इ. आठ ठिकाणी आदळून अक्षराचे स्वरूपात प्रकट होतो. अक्षरांच्या समुदायांचा शब्द व शब्दसमुदायांचे वाक्य तयार होते. त्या शब्दांचे पाठीमागे माणसाने काही नियत संकेतांची योजना करून शब्दांना अर्थ प्राप्त करून दिले. त्यामुळे शब्द व शब्दार्थ ही मानवी कल्पना आहे. त्यामुळे मानवी कल्पनेतून निर्माण झालेल्या काल्पनिक शब्दांनी सत्य ब्रह्माचे ज्ञान होणे शक्य नाही. शब्दाने एखादा पदार्थ किंवा संकल्पना सूचित होते. उदा. सूर्य हा शब्द व दुःख ही संकल्पना. मात्र शब्दाने ब्रह्माचे परोक्षज्ञान (अंदाज) होण्यास मदत होते यात शंका नाही. ह्यामुळेच ब्रह्मज्ञानासंबंधीच्या वाङ्मयाचा अफाट विस्तार झाला आहे.

'**यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते**' (केन १-४) म्हणजे वाणी ज्याविषयी काही बोलू शकत नाही पण ज्याच्या सत्तेवर वाणी बोलते ते ब्रह्म. हे खरे असले तरी '**संताचिया घरी शब्दांचीच रत्ने**' हे तुकोबांचे वचनही खरे आहे. ह्या शब्दरत्नांच्या मदतीनेच ब्रह्मासंबंधी अंदाज येतो. मात्र हे शब्द उपनिषदांचे व उपनिषदांशी सुसंगत असलेल्या गीता व ब्रह्मसूत्रासारख्या ग्रंथाचे असले पाहिजेत, किंवा ह्या शब्दानुसार झालेल्या ब्रह्मज्ञानाचा अनुभव घेतलेल्या ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, नामदेवादी संतांचे असले पाहिजेत. आद्य शंकराचार्यांसारख्या टीकाकारांचे असले पाहिजेत.

उपनिषदांतील शब्दांचे प्रामाण्य मानण्याची काही कारणे आहेत. उपनिषद्वाङ्मय 'अपौरुषेय' मानले जाते. ती ईश्वरी कृती समजली जाते. 'ईश्वराच्या निश्वसितातून वेद निर्माण झाले' असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा ईश्वराने प्रयत्नावाचून सहजतेने त्यांची रचना केली असा त्याचा अर्थ होतो. ईश्वरी बुद्धीत मानवी बुद्धीचे भ्रमादी दोष नसल्याने त्यातून तयार झालेली रचना निर्दोष असते असे श्रद्धेने मानले जाते. मानवी बुद्धीला 'एक असता दुसरेच वाटते'अशा स्वरूपाचा भ्रम होऊ शकतो. माणसाच्या विचारात प्रमाद किंवा चूक होऊ शकते. माणसाच्या इंद्रियांची कार्यक्षमता कमी पडल्याने (करणापाटव) त्याला यथार्थ आकलन न होणे शक्य असते. माणूस स्वतःच्या स्वार्थाला

अनुकूल अशी तत्त्वज्ञानाची उभारणी (विप्रलिप्सा) करणे संभवते म्हणून 'अपौरुषेय श्रुत' (ऐकलेल्या. रचलेल्या नव्हे.) रचनांना श्रुती किंवा उपनिषद म्हणतात. भगवान शंकराचार्य किंवा ज्ञानदेवादी संतांच्या रचना 'ऋतंभरा प्रज्ञेतून' उतरलेल्या असतात. 'ऋत' म्हणजे न्याय व नीतीचे आचरण. संतांची बुद्धी न्याय व नीतीने भरलेली व भारलेली असल्याने व त्यांना ब्रह्मज्ञानाचा अखंड अनुभव असल्याने त्यांच्या रचना श्रद्धेय असतात. ह्या अध्यात्मवाङ्मयाएवढेच महत्त्व श्रीगुरूंच्या मुखातून आलेल्या महावाक्यरूप शब्दांचे आहे.

**मोटके गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे।**
**प्रत्यक्ष फावो लागे तैसें। आपैसयाचि ।।** ज्ञाने. ९-४९।।

'तत् त्वम् असि' ह्या केवळ तीन शब्दांच्या (मोजक्या) श्रीगुरूंच्या वाक्याने शिष्याच्या हृदयात निरंतर व्यापून राहणाऱ्या आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव सहजपणे येतो.

**फोडूनि शब्दाचें अंतर। वस्तु दाखवि निजसार।**
**तोचि गुरु माहेर। अनाथांचे ।।** दा. बो. ५-२-१५।।

'त्वं' पद वाच्य जीव व लक्ष्य कूटस्थचैतन्य आणि 'तत्' पद वाच्य ईश्वर व लक्ष्य ब्रह्म सांगून, दोन वाच्य-लक्ष्यांचे ऐक्य समजावून सांगून श्रीगुरू जीव-ब्रह्माचे ऐक्य साधून देतात. (येथे वाच्यांचे ऐक्य सांगितले आहे कारण जीव व ईश्वर यांचेही घटक समान असतात. त्या घटकांचे एकमेकांशी ऐक्यच आहे.) अशाप्रकारे काही शब्द ब्रह्मज्ञानाला साधक असल्याने 'शब्दप्रमाणाने ब्रह्मज्ञान होते' असे म्हणण्याची पद्धत आहे.

६) **अनुपलब्धी** - 'अनुपलब्धी' हे सहावे प्रमाण आहे. उदा. आग्रा येथे ताजमहाल उपलब्ध आहे. मुंबईत तो उपलब्ध नाही म्हणजे तो मुंबईत अनुपलब्ध आहे. म्हणजे मुंबईत ताजमहाल अनुपलब्धी प्रमाणाचा विषय आहे. ब्रह्म निरपेक्ष व्यापक असल्यामुळे ते 'कोठे आहे, कोठे नाही' असे नाही. ते सर्वत्र उपलब्ध असल्याने ते अनुपलब्धी प्रमाणाचा विषय नाही.

७) **शक्य** - 'ज्याच्या जवळ एक रुपया आहे त्याचे जवळ आठ आणे असणे शक्य आहे' हे विधान वरवर पाहिले तर वेडगळपणाचे आहे. परंतु आठ आणे

हा रुपयाचा अंश असल्याने असे विधान करता येते. एक रुपया असणाऱ्याजवळ आठ आणे असल्याचे ज्ञान 'शक्य' या प्रमाणाने होते. परंतु ब्रह्म हा कोणाचा अंश नसल्याने व ते स्वतः निरंश असल्याने 'शक्य' ह्या प्रमाणाने ब्रह्मज्ञान होत नाही.

८) **ऐतिह्य** - परंपरेने कोणी सांगत आल्याने एखाद्या गोष्टीचे ज्ञान होऊ शकते. उदा. एखाद्या गावातील 'वडाच्या झाडावर भूत आहे' असे ज्ञान त्या गावातील सर्वांना असते. पण कोणीतरी केव्हातरी त्या झाडावर (त्याच्या मताने) भूत पाहिलेले असते व मगच 'इति ह आस' म्हणजे 'येथे भूत आहे' असे ज्ञान 'ऐतिह्य' ह्या प्रमाणाने होते. ब्रह्म कोणालाही कधीही भासत नाही किंवा दिसत नाही. त्यामुळे त्याचे ऐतिह्य प्रमाणाने ज्ञान होत नाही.

९) **चेष्टा** - चेष्टा हे शेवटचे प्रमाण असून 'सांकेतिक खूण दाखविणे' असा त्याचा अर्थ होतो. उदा. इतर तीन बोटे मिटून मधले बोट व तर्जनी एकमेकांपासून दूर ठेवून ताठ करून दाखविली असता ती विजयाची सांकेतिक खूण समजली जाते (V for Victory) त्यामुळे विजयाचे ज्ञान होते. ब्रह्माला अशी एकही खूण नसल्याने या प्रमाणाने ब्रह्मज्ञान होत नाही. एकूण व्यवहारात ज्ञानाच्या ज्या ज्या पद्धती आहेत त्यांतील कशानेही ब्रह्मज्ञान होत नाही. मग ब्रह्मज्ञान हे काय गौडबंगाल आहे?

स्मृती, तर्क, प्रमा, आर्ष, प्रत्यभिज्ञा, भ्रम, धारावाही असे ज्ञानाचे काही प्रकार आहेत. त्यातील एकानेही ब्रह्मज्ञान होत नाही. ह्यातील तर्क व प्रमाज्ञान ह्यांचा विचार करून झाला आहे. स्मृतिज्ञान हे बुद्धीवरील पूर्वीच्या संस्कारावर अवलंबून असते. ब्रह्मज्ञानाचा बुद्धीवर संस्कार होणे शक्य नाही. कारण पदार्थ किंवा प्रसंग ह्यांचाच बुद्धीवर संस्कार होऊन नंतर त्यांचे स्मृतिरूपाने ज्ञान होऊ शकते. ब्रह्म वस्तुरूप किंवा पदार्थरूप नाही. ज्योतिषविद्येला आर्ष विद्या म्हणतात. ज्योतिषशास्त्र काही अनुभवांवर आधारलेल्या ठोकताळ्यांवर अवलंबून आहे. ब्रह्मज्ञान अशा रीतीने होत नाही. 'जो मी लहान असतांना मराठी पहिलीत होतो तोच मी नंतर कॉलेजात शिकून, व्यवसाय करून, विवाह करून आता माझ्या मुलाला शाळेत नेऊन सोडीत आहे.' अशा 'मी' संबंधीच्या ज्ञानाला प्रत्यभिज्ञा

ज्ञान म्हणतात. हे ज्ञान अंतःकरणवृत्तीला होते. ब्रह्माचे अंतःकरणवृत्तीला ज्ञान होत नाही. माळ जमिनीवर भर दुपारी मृगजळाचे भ्रमज्ञान होते. हे ज्ञान सकाळी, संध्याकाळी होऊ शकत नाही. आत्मा भ्रमरूप नसून सत्य आहे व त्याचे ज्ञान कोणावर अवलंबून नाही. एखाद्या पदार्थाकडे सतत टक लावून पाहिले असता त्या पदार्थाचे अखंड धारेप्रमाणे सतत ज्ञान होत राहते. ब्रह्माकडे असे पाहता येत नसल्याने ब्रह्मज्ञान धारावाही ज्ञान नाही.

वस्तुनिष्ठ (Objective ) व व्यक्तिनिष्ठ (Subjective) असेही ज्ञानाचे दोन प्रकार आहेत. ब्रह्मज्ञान ह्या दोन्ही प्रकारांनी होत नाही. म्हणजे ते ज्ञान वस्तुनिष्ठही नाही व व्यक्तिनिष्ठही नाही. व्यवहारातील सर्व ज्ञान ह्या दोनपैकी एक किंवा दोन्ही प्रकारचे असते. अशा ज्ञानाची एवढी सवय झालेली असते की एखादे ज्ञान ह्या दोन्हीहून वेगळे असणे शक्य आहे असे मनातही येत नाही. ते पटणे व अनुभवणे तर दूरच राहिले. वस्तुनिष्ठ ज्ञान वर्णनात्मक (Descriptive) असते. व्यक्तिनिष्ठ ज्ञान विचारात्मक (Reflective) असते. ब्रह्म ही साकार वस्तू नाही. त्यामुळे तिचे होकारात्मक वर्णन करता येत नाही. म्हणून निर्गुण, निराकार, अनादी, अनंत असे नकारात्मक वर्णन करावे लागते. जे पाच ज्ञानेंद्रियांपैकी कशानेच कळत नाही त्याचे वर्णन करता न आल्याने त्याचा विचारही करता येत नाही त्यामुळे 'ब्रह्म कसे आहे' ह्याचा विचार न करता ते कसे नाही ह्याचाच विचार करावा लागतो. 'काय ब्रह्म आहे' ह्याचा विचार न करता 'काय ब्रह्म नाही' ह्याचा विचार करावा लागतो. '**वस्तुसिद्धिर्विचारेण**' असे आचार्य जे म्हणतात ते ह्याच अर्थाने. विचार किंवा मनन हे मनाचे काम आहे. पण ते मनच आत्म्याच्या (ब्रह्म) सत्तेवर क्रियाशील होत असल्याने मनाला आत्म्याचे मनन किंवा विचार करता येत नाही. '**यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् ।**' (केन १-५) उलट ब्रह्मानुभवाच्या क्षणी ते पूर्ण निवृत्त होते. '**यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।**'

मग ब्रह्मज्ञान म्हणजे नेमके काय? पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये ह्यांची आपापल्या विषयाकडील अनावर धाव जेव्हा शांत होते, मन शांत होऊन बुद्धी स्थिर होते तेव्हा जे काही होते त्याला परमगती किंवा ब्रह्मज्ञान म्हणतात.

**यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह।**
**बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम्।।**कठ २-३-१०॥

व्यावहारिक किंवा लौकिक ज्ञान नेहमी सविषय व सविशेष असते. ब्रह्मज्ञान असे नसते. वास्तविक आता जे सांगितले जाणार आहे ते वेगळ्या शब्दात सांगून झाले आहे. पण 'ब्रह्मज्ञान' ही संकल्पना जितक्या प्रकारे समजावून घेणे शक्य आहे तितक्या प्रकारे सर्वाधिक समजावून घेतली तर अधिकाधिक स्पष्ट होत जाते. आपण जेव्हा एखादा पदार्थ डोळ्याने पाहतो तेव्हा तो आपल्या 'डोळा' ह्या ज्ञानेंद्रियाच्या ज्ञानाचा 'विषय' होतो. आपण तो विषय जाणणारे 'विषयी' होतो. म्हणजे विषयीला (मी) विषयाचे (पदार्थ) प्रमाणाने (डोळा) प्रमाज्ञान (प्रत्यक्षज्ञान) होते. म्हणून पदार्थाचे ज्ञान सविषय असते. ब्रह्म हा पदार्थ नसल्याने ते निर्विषय आहे. म्हणून ब्रह्मज्ञान निर्विषय आहे. जो पदार्थ आपण पाहतो त्याला लांबी, रुंदी, जाडी, रंग, गुळगुळीतपणा, खडबडीतपणा इत्यादी विशेष (Particulars) असतात. म्हणून पदार्थ सविशेष म्हणजे विशेषांसह असतो. म्हणून त्याचे ज्ञान सविशेष असते. ब्रह्माला असा एकही विशेष नसल्याने ब्रह्मज्ञान निर्विशेष असते. येथे विषयी हा ज्ञाता असतो व विषय ज्ञेय असतो. विषयीला विषयाचे म्हणजे ज्ञात्याला ज्ञेयाचे सविशेष ज्ञान होते. ब्रह्मज्ञान असे नाही. ज्ञानदेव म्हणतात,

**ज्ञातृ ज्ञेया विहीन। नुसधेंचि जे ज्ञान।**
**सुखा भरलें गगन। गाळीव जें।।** ज्ञाने. १५-७७॥

व्यवहारज्ञान त्रिपुटीयुक्त असते. ब्रह्मज्ञान त्रिपुटीलयानंतर असते. जोपर्यंत ज्ञानासाठी ज्ञाता, ज्ञेय व इंद्रिय ह्यांची गरज आहे, तोपर्यंत त्या ज्ञानाला केवळ पदार्थज्ञानाचे किंवा माहितीचे स्वरूप असते. वस्तुज्ञान (Knowledge) व शुद्धज्ञान (Pure consciousness) ह्यातील फरक जोपर्यंत नीट लक्षात येत नाही तोपर्यंत ब्रह्मज्ञान ही संकल्पना स्पष्ट आकलन होणे कठीण आहे. ज्ञानयोगाचे दृष्टीने ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय, ध्यानयोगाचे दृष्टीने ध्याता-ध्यान-ध्येय व भक्तियोगाचे दृष्टीने भक्त-भगवंत-भक्ती ह्या त्रिपुटींचा लय झाल्याशिवाय ब्रह्मज्ञान होणार नाही.

सांप्रदायिक पद्धतीने श्रवण झालेले नसेल तर ब्रह्मज्ञानासंबंधीच्या काही उपनिषद्वाक्यांनी वाचक घोटाळ्यात पडू शकतो. उदा.

**यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।**

**अविज्ञातं विजानतां विज्ञातं अविजानताम् ।।** केन. २-२-३॥

'मला ब्रह्मज्ञान झाले नाही' असे जो जाणतो, त्याला ते झालेले असते. 'ब्रह्मज्ञान झाले आहे' असे जो जाणतो त्याला ते झालेले नसते. अजाण जाणता असतो, जाणता अजाण असतो. अत्यंत विरुद्ध वाटणारी ही वाक्ये ब्रह्मज्ञानासंबंधी अंदाज बांधण्यासाठी फार उपयुक्त आहेत. मात्र त्यांचा उद्देश लक्षात घ्यावा लागतो. 'मला ब्रह्मज्ञान नाही' असे म्हणणारे लक्षावधी लोक भेटतील म्हणून ते ब्रह्मज्ञ असतात असे मुळीच नाही. ब्रह्म हा खऱ्या अर्थाने ज्ञान होण्याचा किंवा नसण्याचा विषयच नाही. ज्ञान हेच त्याचे स्वरूप आहे. तसे पाहिले तर 'ब्रह्मज्ञान' हा शब्दप्रयोगच चुकीचा आहे. जे ज्ञानरूप आहे त्याचे नव्याने वेगळेपणाने ज्ञान होणे अशक्य आहे. जे ज्ञान 'होते' ते ज्ञेय असल्याने ज्ञात्याहून वेगळेच असते. जेव्हा ज्ञान होत नाही तेव्हा ज्ञेय व ज्ञात्याचा अभाव असतो. उदा. गाढ झोप म्हणून होणारे ज्ञान व अज्ञान ही दोन्ही ज्ञानरूप ब्रह्माहून वेगळी असतात. म्हणून 'मला ब्रह्म कळते' हे ज्ञान व 'मला ब्रह्म कळत नाही' हे अज्ञान ज्ञानरूप ब्रह्माहून वेगळे आहे. 'कळते' व 'कळत नाही' हे दोन्ही बुद्धीचे व्यापार आहेत व जे बुद्धीच्या व्यापारात सापडते ते ब्रह्म नसते. **'यो बुद्धेः परतस्तु सः ।'** असे काठक श्रुती सांगते. श्री ज्ञानदेव म्हणतात -

**मनाची नखी न लगे । जेथे बुद्धीचे दृष्टी न रिगे ।**

**ते इंद्रियां कीर जोगें । काय होईल ।।** ज्ञाने. १२-४१॥

वरील केन श्रुतीच्या संदर्भात संत श्रीज्ञानदेवांनी ब्रह्मज्ञानाचे बाबतीत पुढील निर्णय दिला आहे. तो सर्व संबंधितांनी सतत लक्षात ठेवण्यासारखा आहे.

**एथ जाणीव करी तोची नेणे । आथिलेपण मिरवी तेंचि उणें ।**

**आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे । तो काहींचि नव्हे ।।** ज्ञाने. ९-३६८

'मी ब्रह्मज्ञ आहे' असे जो म्हणतो त्याने ते जाणलेले नसतेच. 'मी ब्रह्मज्ञानविभूषित आहे' असे कोणी मिरवू लागला की त्याचे ठिकाणी ब्रह्मज्ञानाची उणीव आहे असे समजावे. 'मी कृतार्थ झालो' असे जो सांगतो त्याच्या त्या सांगण्याला काडीचीही किंमत नाही. **'यो बुद्धेः परतस्तु सः ।'** असे म्हणणारी श्रुतीच **'दृष्यते**

**त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः।**' (कठ -१-३-१२) असे सांगते. भगवद्गीताही '**बुद्धिग्राह्यं अतीन्द्रियम्**' असे त्याविषयी म्हणते. ह्या दोन्ही ठिकाणी ब्रह्मज्ञानाचे संदर्भात जो विरोधाभास आहे तो ब्रह्मविद्या व ब्रह्मानुभव ह्या दोन शब्दांच्या साह्याने समजावून घेता येतो. ब्रह्मानुभव बुद्धीला येत नाही हे जेवढे खरे तेवढेच अत्यंत सूक्ष्म बुद्धीशिवाय ब्रह्मविद्या समजावून घेता येत नाही हे ही खरे आहे. ब्रह्मानुभव अतीन्द्रिय आहे हे जेवढे खरे तेवढेच ब्रह्मविषयक परोक्षज्ञान बुद्धीला ग्रहण करता येते हेही खरे आहे. '**अद्वैत कुसरी विरळा जाणे**' असे म्हणून संत श्रीज्ञानदेव श्रुतिवाक्याला अनुमोदन देतात. '**नायमात्मा प्रवचनेन लभ्यो**' असे मुंडक श्रुती सांगते (३-२-३) तर '**सत्यं च स्वाध्याय प्रवचने च**' (तै. १-९) असे तैत्तिरीय श्रुती सांगते. ब्रह्मरूप सत्य, स्वाध्याय व प्रवचनाशिवाय बुद्धीला आकलन होत नाही. पण केवळ बुद्धीला आकलन होऊन ब्रह्मानुभव येत नाही असा ह्या विरोधाभासाचा परिहार करावा लागतो. ब्रह्मानुभवाचा उपाय काठक श्रुती सांगते -

**अस्तीत्येवोपलब्धव्यस्तत्त्वभावेन चोभयोः।**
**अस्तीत्येवोपलब्धस्य तत्त्वभावः प्रसीदति॥** कठ २-३-१३॥

प्रत्येक अस्तित्वामध्ये सत्‌रूपाने अखंड असलेल्या तत्त्वाच्या सतत अनुसंधानाने त्या सत्‌ब्रह्मानुभवाचा प्रसाद मिळतो.

'हा तो ब्रह्मानुभव' किंवा 'हे ते ब्रह्मज्ञान' अशाप्रकारे ब्रह्माचा वेगळेपणाने अनुभव का येत नाही त्याचे उत्तर श्रुतीने दिले आहे - '**न तु तद् द्वितीयमस्ति ततोऽन्यद् विभक्तं यत् पश्येत्**।' (बृह. ४-३-२३), '**तस्य भासा सर्वमिदं विभाति।**' (कठ. २-२-१५). ब्रह्मावाचून दुसरे म्हणून व त्याहून वेगळे असे काही असेल तर त्याचा अनुभव येईल ना! म्हणजे एकमेव, अद्वितीय, भेदशून्य व अखंड ब्रह्मावाचून 'काही, कोठे व कोणी' वेगळे नसल्याने त्याचा अनुभव घेणारा किंवा त्याचे ज्ञान करून घेणारा कोणीही नाही. जे काही, कोठे व कोणी वेगळेपणाने जाणवते ते त्याच्या प्रकाशानेच प्रकाशित होते. ते सर्व अचेतन व कल्पित असल्याने जाणणारा कोणीच नाही. असा अद्वैतानुभव येण्यासाठी मुंडक श्रुती सांगते, '**यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम्।**' (३-२-३). शुद्ध व

शांत चित्ताने अनात्म वस्तूंना बाजूला सारीत अंतःकरणवृत्ती आत्मस्वरूपात हरवून टाकण्याचा अभ्यास करीत राहिले असता अचानक, अलगद व हळुवारपणे नित्य प्राप्त असलेल्या ब्रह्माचे जणू पुन्हा ज्ञान होते. तोच आपले स्वरूप साधकांसाठी जणू उघडे करतो. शुद्ध व शांत चित्तासाठी वैराग्याची व अनात्मवस्तू बाजूला सारण्यासाठी विवेकाची अत्यंत आवश्यकता आहे. संत श्रीज्ञानेश्वर म्हणतात -

**तैसे वैराग्याची शिंव न देखती। जे विवेकाची भाष नेणती।**
**ते मूर्ख केवीं पावती। मज ईश्वरातें।।** ज्ञाने.४-२५॥

शेवटी ब्रह्मज्ञानाविषयी संत काय सांगतात ते पाहू. जीव ब्रह्मैक्याच्या अनुभवाला संत ब्रह्मज्ञान म्हणतात असे स्पष्ट दिसते.

**एथ अविद्यानाशु हें स्थळ। तेणें मोक्षोपादान फळ।**
**ह्या दोन्ही केवळ। साधन ज्ञान।।** ज्ञाने. १८-१२४३॥

ह्या ओवीतील 'साधन ज्ञान' हे अविद्या नाहीशी करून किंवा तिचा बाध करून मोक्ष देणारे आहे. 'जीव ब्रह्मरूप आहे' असा दृढ, प्रत्यक्ष व अपरिवर्तनीय अनुभव हेच मोक्षाचे स्वरूप असून त्या अनुभवालाच ब्रह्मज्ञान म्हणतात. श्रीसमर्थ रासदास म्हणतात -

**ऐक ज्ञानाचें लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान।**
**पाहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान।।** दास.५-६-१॥

जीवाने (आपण) आत्म्याला (आपणासी) ऐक्यभावाने जाणले (पाहावे) की जे होते तेच ब्रह्मज्ञान. हीच प्रक्रिया सांगणारी श्रीज्ञानदेवांची ओवी -

**परतोनि पाठिमोरें ठाके। आणि आपणियांतें आपण देखे।**
**देखतखेंवो वोळखे। म्हणे तत्त्व हें मी।।**ज्ञाने. ६-३६६॥

ध्यानकाळी चिदाभासयुक्त अंतःकरणवृत्ती अंतर्मुख होऊन आत्माकार होण्याचा प्रयत्न करते. तेव्हा तिच्यातील चिदाभास (आपणपें) आत्मस्वरूपाला (आपणया) ओळखून 'तो आत्मा मी आहे' अशा अनुभवात ती वृत्ती हरवून जाते. हेच ते ब्रह्मज्ञान. संत श्रीतुकोबाराय म्हणतात

**न करी रे संग राहे रे निश्चळ। लागों नेदी मळ ममतेचा।**
**ह्या नांवे अद्वैत खरे ब्रह्मज्ञान। अनुभवावाचून बडबड ते।।** तु.गा. ८७

भेद, द्वंद्व व त्रिपुटीचा संग सोडून अंतःकरणवृत्ती शांत ठेव. मी व माझेचा मळ तिला लागू देऊ नको. अशी अंतःकरणवृत्ती आत्मस्वरूपात हरवल्यावर जी अद्वैतानुभूती येते तेच खरे ब्रह्मज्ञान. ही अनुभूती न घेता जे केवळ शब्दाने तिचे स्वरूप सांगितले जाते ती निव्वळ बडबड होय।

***